# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक: १८/१/२०११

## दि. १८/१/२०११ रोजीचे वृक्षप्राधिकरण सभेचे इतिवृत्त

३

उल्हासनगर महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाची सभा सोमवार दिनांक १८/१/२०११ रोजी सांयकाळी ४.०० वाजता मा. सभापती तथा आयुक्त यांच्या दालनात आयोजित करण्यांत आली होती. सदर सभेत मा. सभापती तथा आयुक्त व कोणतेही सन्माननिय सदस्य उपस्थित नसल्याने सभा झाली नाही.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक: २५/०१/२०११

## दि. २५/०१/२०११ रोजी घेण्यांत आलेल्या वृक्षप्राधिकरण सभेचे इतिवृत्त

१

उल्हासनगर महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरणाची सभा, दिनांक २५/०१/२०११ रोजी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील मा. आयुक्तांच्या दालनात आयोजित करण्यात आली सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य उपस्थित होते.

श्री. अशोककुमार रणखांब ––आयुक्त तथा सभापती

| | |
|---|---|
| १. श्री. राजू इदनानी | सदस्य |
| २. श्री. विनोद ठाकुर | सदस्य |
| ३. श्री. अंकुश म्हस्के | सदस्य |
| ४. श्री. लाल पंजाबी | सदस्य |
| ५. श्री. जमनु पुरस्वानी | सदस्य |

खाली दर्शविलेले सदस्य/सदस्या सभेत अनुपस्थित होते

| | |
|---|---|
| १. श्रीम. मोना वनवारी | सदस्या |
| २. श्री. राजेश वानखेडे | सदस्य |
| ३. श्री. मीना सोनेजी (सोंडे) | सदस्या |
| ४. श्री. दिलीप गायकवाड | सदस्य |
| ५. श्रीम. ज्याती माने | सदस्या |
| ६. श्रीम. रजनी महाडीक | सदस्या |
| ७. श्री. बी.बी. मोरे | सदस्य |
| ८. श्री. राजू जग्यासी | सदस्य |
| ९. श्री. सुरेखा वेलकर | सदस्या |
| १०.श्रीम. निलू चांदवानी | सदस्या |

खाली दर्शविलेले अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. प्रकाश पं. कुकरेजा, महापालिका सचिव
२. श्री. दिपक मोरे, प्रभाग अधिकारी तथा वृक्ष अधिकारी
३. श्री. नानासाहेब कामटे, प्रभाग अधिकारी तथा वृक्ष अधिकारी
४. श्री. समिर घोलप, प्रभाग अधिकारी तथा वृक्ष अधिकारी
४. श्री. भगवान कुमावत, प्रभाग अधिकारी तथा वृक्ष अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. तानाजी पतंगराव, लिपिक

सायंकाळी ४.३० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजाः– विषय क्रमांक. १ वाचुन दाखवितात.

विषय क्र १ :– मागील सभेचे दिनांक १८/१०/२०१० रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :–** मागील सभेत दोन तीन सदस्यांनी असा मुददा उपस्थित केला होता की, झाड तोडल्यानंतर त्या ठिकाणी जी पाच झाडे लावायची आहेत ती लावली जात आहेत की नाहीत? त्यांचा अहवाल सभेपुढे आला पाहिजे त्याचबरोबर वृक्ष गणना करण्याबाबतीत जे निर्देश देण्यात आले होते त्यानुसार वृक्ष गणना करण्यात आली आहे की नाही ते सांगा त्यानंतर इतिवृत्त कायम करु.

**श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :–** ठाणे महानगरपालिकेत तसेच इतर दोन तीन महानगरपालिकेमध्ये ज्यां संस्थेने वृक्ष गणनेचे काम केले आहे त्याच्याकडुन वृक्षगणने विषयीची सर्व माहिती घेवुन व योग्य वाटल्यास त्यांच्याकडुन आपण वृक्ष गणनेचे काम करुन घेवु.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :–** परवानगी मिळण्या अगोदरच झाड तोडण्यात आलेले आहे मात्र त्याचा अहवाल वृक्षप्राधिकरणास अदयाप देण्यात आलेला नाही, विषय क्र.२ वर दर्शविलेले झाड तोडले आहे आणि झाड तोडण्यास परवागनी घेण्याचा विषय आता सभेपुढे आणला आहे.

**श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :–** वृक्ष अधिकारी, श्री. कुमावत याबाबतची माहिती दया

**श्री. भगवान कुमावत, वृक्ष अधिकारी, प्रभाग समिती क्र.३:–** आजच्या सभा सुचनेवर दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या विषयातील दुर्गी निवास, बॅरेक नंबर १४६३ समोर, सेक्शन ३१, उल्हासनगर ४ येथील दोन जंगली झाडे श्री. राजेद्र पांडे यांनी वृक्ष प्राधिकरणाची मंजुरी न घेताच तोडली आहेत.

**श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :–** तोडलेल्या झाडाच्या बदल्यात त्याठिकाणी लावण्यात आलेल्या झाडाचा फोटोसह अहवाल संबंधीत वृक्ष अधिकाऱ्यानी दयायचा आहे. असा अहवाल दिला नसेल तर ते आयुक्तांना जबाबदार राहतील.

**श्री. भगवान कुमावत, वृक्ष अधिकारी, प्रभाग समिती क्र.३:–** प्रभाग समिती ३ अंर्तगत येणा–या विभागातील झाडे तोडण्यासाठी देण्यात आलेल्या परवानगीचा तपशिल मी आपणास वाचून दाखवितो

श्री. किशोर द. शेटे, बॅरेक नं. १५०७, उल्हासनगर ४ यांना ठराव क्र. ८० दि.७/११/२००९ अन्वये झाड तोडण्यास परवानगी देण्यात आली होती त्यानुसार त्यांनी एक झाड तोडले आहे. त्यानुसार पाच झाडे लावुन संबंधितांनी कार्यालयात अहवाल देण्यात आला आहे. परंतु सध्या झाडांची रोपे अस्तित्वात नाही. तसेच पाया खोदण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

श्री. इंद्रदेव कन्हाई प्रसाद, बॅरेक नं. ११६१/३, पवई चौक, उल्हासनगर–४ यांना ठराव क्र. ८२, दिनांक १२/७/२०१० अन्वये झाड तोडण्यास परवानगी घेतली असून झाड तोडण्यात आलेले नाही.

श्री. हिरानंद माखिजा व श्री. प्रशांत सुधीर खाडीकर, शांतीनगर, स.नं. १६३, हि.स. १११ (भा), उल्हासनगर–३ यांना ठराव क्र. ९१, दिनांक १८/१०/२०१० अन्वये झाड तोडण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यानुसार संबंधितांनी सदर जागेवर बांधकाम मंजूरी घेतली असून, बांधकाम करण्यात झाडांचा उपद्रव असून, सदर ठिकाणी झाडे तोडुन बांधकाम प्रगती पथावर आहे व पाच रोपे लावण्यात आलेली आहेत.

श्री. रमेश लालवानी, बॅरेक नं. १४६६/१,२,१९,२०, उल्हासनगर–४ यांना ठराव क्र. ९१, दिनांक १८/१०/२०१० अन्वये झाड तोडण्यास परवानगी देण्यात आलेली होती. त्यानुसार संबंधितांनी सदर जागेवर बांधकाम मंजूरी घेतली असून, बांधकाम करण्यात झाडांचा उपद्रव असून, सदर ठिकाणी झाडे तोडुन बांधकाम प्रगती पथावर आहे

**सदस्य श्री. लाल पंजाबी:–** झाड तोडण्यास परवानगी देण्यात आलेल्या सर्वांकडुन अनामत रक्कम घेण्यात आलेली आहे ना?

**श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :–** एक झाड तोडल्याबदद्ल तेथे जी पाच झाडे लावायची आहेत ती लावली आहेत काय? आणि लावली असल्यास ती व्यवस्थीत आहेत किंवा नाहीत याचा फोटोसह अहवाल दया.

सदस्य श्री. लाल पंजाबी:— झाड तोडण्या सदंर्भात आपण जी अनामत रक्कम घेतो ती किती घेतो?

श्री. भगवान कुमावत, वृक्ष अधिकारी, प्रभाग समिती क्र.३:— एक हजार रुपये.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— हे पहिल्या पासुनच आदेशात नमुद आहे, तोडलेल्या झाडाच्या बदल्यात जो पर्यंत पाच झाडे लावली जात नाहीत तोपर्यंत अनामत रक्कम परत केली जाणार नाही.तसेच तोडलेल्या झाडाचे ठिकाणी ५ झाडे लावण्यांत आली आहेत किंवा नाहीत त्याचा अहवाल प्राधिकरणापुढे आला पाहिजे.

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :— तर मग, यासभेत झाडे तोडण्यास आपण परवानगी देत नाही.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— सभा पुढे ढकलली जावी.

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :— मागील सभेत निर्देश दिल्याप्रमाणे जोपर्यंत अहवाल दिला जात नाही तोपर्यंत झाडे तोडण्यास परवानगी दिली जावु नये.

सदस्य श्री. जीवन इदनानी:— _सभा स्थगित करा आणि अहवाल मागवा.

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :— तोडण्यात आलेल्या झाडाच्या बदल्यात जी पाच झाडे लावायची आहेत ती मोठी होणारी झाडे लावायची आहेत. गुलाबाच्या झाडांसारखी लहान लहान रोपे लावायची नाहीत.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— झाड तोडण्यास परवानगी देण्याबाबतचे काही अर्जदारांचे प्रस्ताव वृक्ष प्राधिकरणापुढे मजुंरीस्तव येतात तर काही अर्जदारांचे प्रस्ताव वृक्ष प्रधिकरणा पुढे येत नाहीत याचे कारण काय? सात महिन्यापूर्वी दिलेल्या अर्जानुसारचा प्रस्ताव अद्याप वृक्ष प्राधिकरणा पुढे आलेला नाही मात्र तीन महिन्यापूर्वी दिलेल्या अर्जानुसारचा प्रस्ताव वृक्ष प्राधिकरणा पुढे आलेला आहे. ज्याचा अर्ज अगोदर येईल त्याचा
प्रस्ताव अगोदर वृक्ष प्राधिकरणापुढे आला पाहिजे.

सदस्य श्री. जीवन इदनानी:— प्रभाग समिती २ अर्तंगत येणाऱ्या प्रिन्स अपार्टमेंन्ट शेजारील झाड तोडण्याविषयी परवानगी देण्याचा प्रस्ताव वृक्ष प्राधिकरणा पुढे का आलेला नाही?

श्री. अशोककुमार रणखांब, मा. आयुक्त तथा सभापती :—_वृक्ष अधिकारी प्रभाग समिती २, हा प्रस्ताव प्राधिकरणा पुढे का आला नाही? वृक्ष अधिकारी म्हणुन तुम्ही काही काम पाहत आहात की नाहीत ?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— अधिकारी काहीही काम करत नाहीत, नगरसेवक स्वत: सचिंका घेवुन शिपायासारखा प्रत्येक टेबल टेबलवर फिरत असतो आणि स्वत:च त्याची ती सचिंका प्रत्येक विभागाकडुन मंजुर करुन आणत असतो.

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :—_वृक्ष अधिकारी म्हणुन तुम्ही काय करता? तुमच्या कडे महिन्याला जास्तीत जास्त दहा ते पधंरा अर्ज येत असतील त्यांवर कार्यवाही करण्यासाठी तुम्हाला वेळ मिळत नाही काय?

श्री. समिर घोलप, वृक्ष अधिकारी:— मी आताच तीन चार महिन्यापासुन आलो आहे, मला याबाबतील अधिक माहिती नाही.

सदस्य श्री. जीवन इदनानी:— तीन चार महिने झालेत ना? तीन चार दिवस तर नाहीत ना? चार महिन्यांचा कालावधी कमी झाला का संचिकांचे सादरीकरण करण्यास ?

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :— प्रत्येक प्रभाग समितीमध्ये वृक्ष अधिकारी यांच्याकडे दिनांक निहाय जे अर्ज प्राप्त होतील त्यांच्या अनुक्रमांनुसार प्रत्येक प्रभाग अधिकाऱ्यांने कार्यवाही करुन अहवाल दयायचा आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— कॅम्प नंबर १ मधील सुध्दा झाड तोडण्याविषयीचा माझा एक अर्ज ब—याच दिवसापासून प्रलंबित आहे तो अद्याप वृक्ष प्राधिकरणापुढे मंजुरीस्तव आलेला नाही त्याचे कारण काय?

सदस्य श्री. विनोद ठाकुर :— झाड तोडण्यासाठी ज्या कुण्या इसमाची हरकत असेल त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात वृक्ष अधिकारी यांच्याकडे सादर करावी अशा आशयाची वर्तमान पत्रामध्ये जी नोटीस प्रसिध्दीस दिली जाते ती मराठी वर्तमान पत्रामध्ये का दिली जात नाही? फक्त धनुषधारी आणि उल्हास विकास या हिंदी वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दीस दिली जात आहे असे का?

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :— ही नोटीस कोणत्या विभागाकडुन प्रसिध्दीस दिली जाते?

श्री. भगवान कुमावत, वृक्ष अधिकारी, प्रभाग समिती क्र.३:— जनसंपर्क विभागामार्फत

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :—जनसपर्क अधिकारी यांना बोलावुन घ्या.

श्री. अंकुश म्हस्के:— काही ठिकाणी झाडांवर जाहितीचे होर्डींगस लावले जातात, त्यामुळे झाडाची वाढ खुटंते, सहा सहा महिने हे होर्डीगस काढले जात नाहीत. माझे प्रभागात शांतीनगर येथे माझे कार्यालया समोरील एका झाडावर सहा महिन्यापासुन होर्डींग लावले आहे. आणि त्यामुळे त्या झाडाची वाढ खुटंली आहे.

सदस्य श्री. जीवन इदनानी:— महापालिका मुख्यालयाच्या प्रवेशव्दारा समोरील स्वामी विवेकानंद पुतळया जवळ, तीन चार होर्डींगस कितीतरी दिवसांपासुन लावण्यात आलेले आहेत ते काढण्यासाठी प्रभाग अधिकाऱ्यांना कितीतरी वेळा सांगितले आहे, ते होर्डीगस का काढले जात नाहीत? ते जर हटविले जात नसतील तर संबंधीत वृक्ष अधिकाऱ्यांवर कारवाई करा. झाडास दुखापत केली म्हणुन असे होर्डींग जप्त करा.

श्री. समिर घोलप, वृक्ष अधिकारी:— ते होर्डींग मा. महापौरांचे होते ते हटविण्याची कार्यवाही करत असतांना श्री. म्हसाळ साहेबांनी सांगितले की, ते होर्डींग त्या काढुन घेणार आहेत.

यावेळी श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री. विनोद ठाकुर:— झाड तोडण्या संदर्भात हरकती मागविणारी नोटीस हिंदी वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्दीस दिली जाते. पुण्यनगरी, ठाणेवैभव अश्या मराठी वर्तमान पत्रांमध्ये ही नोटीस प्रसिध्दीस का दिली जात नाही?

श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी:— उल्हासनगर मधुन दोन हिंदी व एक सिंधी वर्तमान पत्र प्रकाशित होत आहेत . एकही मराठी वर्तमान पत्र उल्हासनगर मधुन प्रकाशित होत नाही. जिल्हा स्तरावरील स्थानिक वर्तमान पत्रामध्ये सुचना प्रसिध्दीस दयावी असा नियम असल्यामुळे धनुष्यधारी व उल्हास विकास या वर्तमान पत्रामध्ये नोटीस प्रसिध्दीस दिली जात आहे.

सदस्य श्री. जीवन इदनानी:— कायदा काय म्हणतो?

श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी:— महापालिकाक्षेत्रातुन प्रसिध्द होणा—या स्थानिक वर्तमान पत्रातुन नोटीस प्रसिध्दी दयावी. अशी कायद्यात तरतुद आहे.

सदस्य श्री. जीवन इदनानी:— कायदयानुसार आहे तर ठीक आहे, विवेकानंद पुतळयाच्या आजुबाजुला एवढे मोठमोठे बोर्ड लावले आहेत त्याबाबत काय कार्यवाही केली?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— याबाबत प्रभाग समिती १ चे प्रभाग अधिकारी श्री. दिपक मोरे यांनी अतिशय चांगले काम केले आहे.

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :—होर्डींगस, बॅनर्स् बाबत लवकरच एक धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतचा प्रस्ताव आणण्यात येणार आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर:— रस्त्यांनी जाता येताना कधी कुठे कुणी झाड तोडत असल्याचे पाहुन कधी कधी आम्ही संबंधीत प्रभाग कार्यालयात दुरध्वनी वरुन कळविले तर, ते लगेच झाड तोडण्याऱ्यांस फोन करुन कळवितात की अमुक या माणसाने तुम्ही झाड तोडत असल्याची आमच्याकडे तक्रार केली आहे.

श्री. अशोककुमार रणखांब, . आयुक्त तथा सभापती :— कोणत्या प्रभाग समितीत असे झाले आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर:— प्रभाग समिती ४ मध्ये श्री. हरेश होतवानी व श्री तरूण सेवकानी हे झाड तोडणा—यास तक्रारदाराचें नाव सांगत असतात.

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :— श्री. कामटे, परवानगी न घेता कुणी झाड तोडत असेल तर नियमानुसार त्यावर कारवाई करा. आणि आपल्या प्रभाग समितीतील ते जे दोन कर्मचारी झाड तोडण्याऱ्यांना तक्रारदाराची माहिती पुरवितात त्यांच्यावर उप—आयुक्त, मुख्यालय यांच्यामार्फत कारवाई केली जाईल. तसेच आजपर्यंत झाडे तोडण्यासाठी किती अर्ज प्राप्त झाले त्यातील किती अर्जदारांना झाडे तोडण्यास परवानगी देण्यात आली? व किती अर्ज प्रलंबित आहेत? यांची अनुक्रमांक निहाय माहिती तयार करा.

श्री. भगवान कुमावत, वृक्ष अधिकारी, प्रभाग समिती क्र.३:— मला एक अडचण आहे ती मी आपणांसमोर मांडु का?

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :— मांडा, काय विचारायचे आहे आपणांस?

श्री. भगवान कुमावत, वृक्ष अधिकारी, प्रभाग समिती क्र.३:— एखादया व्यक्तीने बिना परवानगी झाड तोडल्यानंतर त्यांच्यावर एफ.आय.आर. दाखल करण्या विषयी वृक्ष प्राधिकरणापुढे प्रस्ताव ठेवला पाहिजे का?

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :—बिनापरवानगी कुणी झाड तोडत असेल त्यावर एफ.आय.आर. दाखल करण्याचे तुम्हास अधिकार आहेत अधिनियमातच तशी तरतुद आहे त्यासाठी आदेश मिळविण्यासाठी वृक्ष प्रधिकरणाच्या सभेची वाट पाहण्याची आवश्यकता नाही.

सदस्य श्री. विनोद ठाकुर:— आजपर्यंत किती झाडे तोडण्यास परवानग्या देण्यात आलेल्या आहेत? किती झाडे तोडण्यात आली? त्याबदल्यात किती झाडे लावण्यात आली? याची वेळोवेळी माहिती मागुनही ती प्राप्त होत नाही आपणांकडे ही माहिती नाही परंतु पत्रकारांकडे ही माहिती आहे. चार वर्षात १८२ झाडे तोडण्यास परवानगी दिली असल्याचे आजच्याच पुण्यनगरी मध्ये छापुन आले आहे.

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :— विठठलवाडी स्टेशन जवळील अम्ब्रेसिया हॉटेलच्या परिसरात झाडे तोडल्याबाबत मनसेच्या कार्यकर्त्यांनी तक्रार केली होती, त्याबाबतच्या कारवाई संदर्भात तुमच्यावर कोणाचा दबाव येत आहे काय? विना परवानगी झाड तोडणा—यांवर एफआयआर दाखल करण्याचे वृक्षअधिका—यांना अधिकार आहेत त्यानुसार कारवाई का केली जात नाही तसेच आजच्या सभासुचनेवरील विषय क्रमांक २ वर दर्शविलेल्या ठिकाणचे झाड कधी तोडले आहे?

सदस्य श्री. अकुंश म्हस्के:— ते झाड तोडुन चार पाच दिवस झाले आहेत.

श्री. अशोककुमार रणखांब,  . आयुक्त तथा सभापती  :—झाडे तोडण्यास परवानगी मिळण्याबाबतचा प्रस्ताव वृक्ष अधिकाऱ्याने कधी दिला आहे?

श्री. भगवान कुमावत, वृक्ष अधिकारी, प्रभाग समिती क्र.३:— १८/१२/२००९ रोजी या विषयीचा गोषवारा सचिव कार्यालयाकडे देण्यात आला होता व दिनांक १२/०७/२०१० रोजीच्या सभासुचनेवर क्र. २ अन्वये हा विषय प्राधिकरणापुढे मंजुरीस आणण्यात आला होता प्राधिकरणाने ठराव क्र. ८१ अन्वये सदरची झाडे तोडण्याचा प्रस्ताव नाकारला आहे. आणि त्यानंतर पुन्हा हा प्रस्ताव प्राधिकरणापुढे आलेला आहे.

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :—नाकारलेला प्रस्ताव पुन्हा मजुंरीस आणला आहे व झाडे तोडण्यास परवानगी देण्याअगोदरच झाडे तोडली आहेत म्हणजे डब्बल गुन्हा आहे.

श्री. भगवान कुमावत, वृक्ष अधिकारी, प्रभाग समिती क्र.३:— हा प्रस्ताव माझ्याकडुन आलेला नाही तो तत्कालीन वृक्ष अधिकारी श्री. समतानी यांच्याकडुन आलेला आहे.

सदस्य श्री. जीवन इदनानी:— विषय क्रमांक २ बाबत चौकशी करुन नियमाप्रमाणे कारवाई करावी.

महापालिका सचिव:— महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट मध्ये अशी तरतुद आहे की, ६० दिवसांमध्ये परवानगी दिली नाही तर, ती दिली आहे असे समजुन पुढील कारवाई करता येते.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— एम.आर.टी.पी. ॲक्ट मधील तरतुदी सारखी या अधिनियमात तरतुद असेल तर एखादा हुशार व्यक्ती झाड तोडण्यासाठी दोन तीन महिने अगोदर अर्ज देवुन गुपचुप बसेल कारण की त्याला माहित आहे की, या अर्जाबाबत कुणाची ना कुणाची तरी हरकत येईल आणि त्यामुळे आपणास हे झाड तोडण्यास परवानगी मिळणार नाही. परंतु अर्ज देवुन २ महिन्यांचा कालावधी उलटुन गेल्यानंतर जर त्यांस विनंती मान्य किंवा अमान्य केल्याचे कोणतेही पत्र मिळाले नाही तर विहित केलेल्या मुदतीत उत्तर मिळाले नाही म्हणुन परवानगी दिली आहे असे समजुन झाड तोडता येईल. यासाठी अर्ज दिल्यापासून एक महिन्याच्या आत अर्ज निकाली काढण्यासाठी वृक्ष प्राधिकरणाची महिन्यातून किमान एक सभा झाली पाहिजे.

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :—४५ ते ६० दिवसांची मुदत असते त्याच्या आत कार्यवाही झाली पाहिजे. एखादया प्रकरणात कार्यवाही पुर्ण झाली नसेल तर अतंरिम उत्तर दिले पाहिजे. तसेच प्रत्येक प्रकरणावर वृक्ष अधिकाऱ्यांचा स्वयंस्पष्ट अभिप्राय असला पाहिजे. एकुण किती अर्ज प्राप्त झाले त्यातील किती अर्ज निकाली काढले, किती अर्ज प्रंलबित आहेत तसेच विना परवानगी किती झाडे तोडली. त्यावर काय कारवाई केली, तोडलेल्या झाडांच्या ठिकाणी मोठी होणारी झाडे लावली की नाही, लावली असतील तर त्यांचा फोटो घेवुन वृक्ष अधिकाऱ्यांने आपल्या अभिलेखात ठेवला पाहिजे.

महापालिका सचिव:— नविन झाडे लावण्यासंदर्भात दहा दहा हजार रूपये अनामत रक्कम घेतली पाहिजे.

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :—एखादया ठिकाणचे झाड तोडुन जर त्याठिकाणी वाणिज्य वापरासाठी इमारत बांधली जात असेल तर तेथील तोडलेल्या झाडाच्या बदल्यात तेथे लावावयाच्या झाडासांठी घ्यावयाची अनामत रक्कम किती असावी याबाबतीत मुख्य वृक्ष अधिकारी यांच्याशी विचार विमर्ष करुन निर्णय घ्या. समजा दहा हजार चौ.मी. चा एखादा प्रकल्प असेल त्याठिकाणच्या तोडलेल्या झाडाच्या बदल्यात तेथे लावावयाच्या झाडांसाठी अनामत रक्कम किती घ्यायची आणि त्यापेक्षा अधिक क्षेत्र असलेल्या प्रकल्पाच्या ठिकाणी अशा कांमासाठी अनामत रक्कम किती घ्यायची याचा निर्णय घ्या.

सदस्य श्री. जीवन इदनानी:— व तो प्रस्ताव लेखा विभागास पाठविला जावा. अर्थसंकल्पामध्ये त्यांची नोंद आली पाहिजे.

सदस्य श्री. लाल पंजाबी:— झाड तोडण्याअगोदर अनामत रक्कम घेतली जावी. झाड लावले नाही तर ही रक्कम जप्त केली जावी

<u>महापालिका सचिव:—</u> झाड तोडण्यास परवानगी देण्याअगोदर अनामत रक्कम घेतली जावी. झाड लावले नाही तर ही रक्कम जप्त केली पाहीजे.

<u>श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती</u> :— झाड तोडुन त्याठिकाणी ज्याला बंगला बाधायंचा आहे असाच माणुस तुम्हाला पाहिजे तेवढी अनामत रक्कम देवु शकेल , यासाठी मुख्य वृक्ष अधिकारी यांच्याशी चर्चा करुन दर निश्चित करा, व हे तुम्ही २८ तारखेपूर्वी करा. वृक्ष प्राधिरणासाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र लेखा शिर्ष तयार करा असे श्री. कुमावत तुम्ही लेखा विभागात जावुन सांगा . २७ जानेवारीला श्री. जवादे सांहेबाना बोलवा त्यांच्याशी चर्चा करा, वृक्ष प्राधिकरणासाठी किती निधी लागेल ते ठरवा. माझ्या मते कमीत कमी पाच लाख रुपये लागतील. आपल्या येथे पुष्प प्रदर्शन भरवायचे आहे त्यासाठी मिरा—भाईदर येथून याविषयीची माहिती गोळा करा. संपुर्ण वर्षभरात वृक्ष प्राधिरणाच्यावतीने काय काय कामे करण्यात येणार आहेत त्याची माहिती लेखा विभागाला दया म्हणजे त्याची अर्थसंकल्पात नोंद येईल व मंजुरी घेण्यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार करा.

<u>सदस्य श्री. अकुंश म्हस्के:—</u> रस्ता दुभाजकामध्ये आपण जी काही झाडे लावली आहेत त्यातील काही झाडे जळाली आहेत, तेथे नवीन झाडे लावली जावु शकतील का?

<u>श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती</u> :— लावता येतील

<u>काही सदस्य :—</u>पास पास........

<u>श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती</u> :— मागील सभेचे दिनांक १८/१०/२०१० रोजीचे

इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे..

---

☑

<u>विषय क्र १:—</u> मागील सभेचे दिनांक १८/१०/२०१० रोजीचे इतिवृत्त कायम करणे

<u>वृक्षप्राधिकरण ठराव क्र :—</u> ९६ अ <u>दिनांक:— २५/१/२०११</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. अंकुश म्हस्के

हे वृक्षप्राधिकरण महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक १८/१०/२०१० रोजीचे पृष्ठ क्र. १ ते १४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>एकमताने</u>

आयुक्त /सभापती

वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:—</u> विषय क्रमांक. २ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र २ :—</u> *दुर्गीनिवास मागे, बॅ. नं. 1463च्या समोर, सेक्शन 31, उल्हासनगर-4 येथिल **दोन जंगली झाडे** तोडणेस परवानगी देणे*

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u> संबधीतावर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात यावी.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर:—</u> कारवाई करुन पुढील सभेत अहवाल देण्यात यावा.

<u>काही सदस्य :—</u>पास पास........

<u>श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती</u> :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..

☑<u>विषय क्र २ :—</u> *दुर्गीनिवास मागे, बॅ. नं. 1463 च्या समोर, सेक्शन 31, उल्हासनगर-4 येथिल **दोन जंगली झाडे** तोडणेस परवानगी देणे*

## <u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयाबाबत श्री. राजेंद्र आर. पांडे यांनी त्यांच्या दिनांक २५/८/२००८ च्या पत्रानुसार *दुर्गीनिवास मागे, बॅ. नं. 1463 च्या समोर, सेक्शन 31, उल्हासनगर-4* या ठिकाणी असलेल्या दोन जंगली झाडे तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१. उक्त झाड सद्यस्थितीमध्ये धोकादायक वाटत नसले तरी त्यांच्या पायथ्याशी असलेले मुळे आजुबाजुच्या घरांच्या खाली गेल्याने घरांच्या भिंतींना व पायाला धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे सदर जंगली (दोन) झाडे तोडणे आवश्यक आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

<u>वृक्षप्राधिकरण ठराव क्र :—</u> ९७ <u>दिनांक:— २५/१/२०११</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. अंकुश म्हस्के

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. राजेंद्र आर. पांडे यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका—याच्या अहवालावरून *दुर्गानिवास मागे, बॅ. नं. 1463 च्या समोर, सेक्शन* 31, *उल्हासनगर*-4 या ठिकाणी असलेली दोन जंगली झाडे तोडणेस परवानगी देत नाही.

कारण——

सदरची झाडे यापुर्वीच तोडण्यांत आलेली आहेत. त्यामुळे वृक्ष अधिका—यास संबंधिता विरुध्द गुन्हा दाखल करणे किंवा इतर कायदेशीर कारवाई करण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:—</u> विषय क्रमांक. ३ वाचुन दाखवितात.

☑ <u>विषय क्र ३ :—</u> *बॅरेक नं. 898/ रु.म.नं. 1 व 2 शेजारी, सेक्शन*-20 *उल्हासनगर*-3 *येथिल* ***आंब्याचे झाड*** *तोडणेस परवानगी देणे.*

<u>महापालिका सचिव :—</u> हा प्रस्ताव सभासुचनेवर आल्यानंतर एक हरकत आली आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u> कुणाची आहे?

<u>महापालिका सचिव :—</u> एका पत्रकाराची आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u> पत्रकार? जो दिवसाला पंचवीस तक्रारी करतो व मागे घेतो तो?त्या हरकतीस काही दम नाही,

<u>श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती</u> :— हरकतदाराला बोलवा, सुनावणी दया, सुनावणीचे अभिलेखे ठेवा. आणि त्याची हरकत फेटाळुन लावा.

<u>काही सदस्य :—</u>पास पास........

<u>श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती</u> :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..

---

☑ <u>विषय क्र ३ :—</u> *बॅरेक नं. 898/ रु.म.नं. 1 व 2 शेजारी, सेक्शन*-20 *उल्हासनगर*-3 *येथिल* ***आंब्याचे झाड*** *तोडणेस परवानगी देणे.*

## प्रस्तावना

उपरोक्त विषयाबाबत श्री. दौलतराम व्ही. वलेचा/श्री. बिपीन वलेचा यांनी त्यांच्या दिनांक ८/९/२०१० च्या पत्रानुसार बॅरेक नं. 898/ रु.म.नं. 1 व 2 शेजारी, सेक्शन-20 उल्हासनगर-3 या ठिकाणी असलेल्या आंब्याचे झाड तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१. उक्त झाड सद्यस्थितीमध्ये धोकादायक वाटत नसले तरी त्यांच्या पायथ्याशी असलेले मुळे आजुबाजुच्या घरांच्या खाली गेल्याने घरांच्या भिंतींना व पायाला धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे सदर झाड तोडणे आवश्यक आहे.

श्री. दौलतराम बी. वलेचा/श्री. बीपीन बी. वलेचा, ८९८/१ व २ शेजारी, सेक्शन २०, उल्हासनगर—३ यांचे प्राप्त अर्जानुसार तेथिल आंबा जातीचे झाड तोडणेबाबतची नोटिस दिनांक ८/१२/२०१० रोजी ही जनसंपर्क कार्यालयाद्वारे प्रसिध्द केलेली असून, दिनांक २७/१२/२०१० रोजी हरकत द्यावयाची अंतिम मुदत होती. संघर्ष सामाजिक संस्था यांचे दिनांक १५/१२/२०१० च्या पत्रान्वये हरकत घेतलेली असून, त्यांनी सदरचे आंब्याचे झा डहे रस्त्यालगत असून, उत्तम स्थितीत असल्याचे नमुद केले आहे. वृक्ष अधिकारी प्रभाग समिती क्र. ३ यांनी दिनांक ३०/११/२०१० रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता, सदरचे आंब्याचे झाड हे रस्त्यावर नसून, त्यांचे कंपाउंडचे आत आहे. सदर बाबतचे फोटो काढलेले असून, सामाजिक संघर्ष संस्थाने घेतलेला आक्षेपाबाबत वृक्ष प्राधिकरण समितीद्वारे योग्य तो निर्णय घेणेस प्रस्तावित.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :— ९८ दिनांक:— २५/१/२०११

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. अंकुश म्हस्के

हे वृक्षप्राधिकरण सामाजिक संघर्ष संस्थेची तथ्यहिन हरकत नाकारुन श्री. दौलतराम व्ही. वलेचा/ श्री. बिपीन वलेचा यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका—याच्या अहवालावरून बॅरेक नं. 898/ रु.म.नं. 1 व 2 शेजारी, सेक्शन-20 उल्हासनगर-3 या ठिकाणी असलेले आंब्याचे झाड तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीची पाच नविन झाडे ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:— विषय क्रमांक. ४ वाचुन दाखवितात.

विषय क्र ४ :— बॅ.नं. 1346/ रुम नं. 2 ते 5 शेजारी, बँक ऑफ महाराष्ट्र मागे, उल्हासनगर-4 येथिल **आंबा, दोन उंबर व जंगली झाड** तोडणेस

परवानगी देणे.

<u>काही सदस्य :—</u>पास पास........

<u>श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती</u> :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..

---

☑ <u>विषय क्र ४ :—</u> *बॅ.नं. 1346/ रुम नं. 2 ते 5 शेजारी, बॅंक ऑफ महाराष्ट्र मागे, उल्हासनगर-4 येथिल* ***आंबा, दोन उंबर व जंगली झाड*** *तोडणेस परवानगी देणे.*

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयाबाबत मे. रिजन्सी बिल्डर यांनी त्यांच्या दिनांक ३०/६/२०१० च्या पत्रानुसार बॅ. नं. १३४६/ रुम नं. २ ते ५ शेजारी, बॅंक ऑफ महाराष्ट्र मागे, उल्हासनगर—४ या ठिकाणी असलेल्या आंबा, दोन उंबर व जंगली झाड तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१. सदर ठिकाणी अर्जदार यांना बांधकाम नकाशा मंजूर करण्यात आलेला असून अस्तित्वात असलेले झाडे हे बांधकाम सुरु करण्यापूर्वी तोडणे आवश्यक आहे. त्यानुसार सदरचे झाडे तोडणे आवश्यक आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

<u>वृक्षप्राधिकरण ठराव क्र</u> :— ९९ <u>दिनांक:— २५/१/२०११</u>

सुचकाचे नाव :— श्री. अंकुश म्हस्के

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

*हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मे. रिजन्सी बिल्डर यांच्या अर्जावरुन व वृक्ष अधिका-याच्या अहवालावरुन बॅ.नं. 1346/ रुम नं. 2 ते 5 शेजारी, बॅंक ऑफ महाराष्ट्र मागे, उल्हासनगर-4 या ठिकाणी असलेले एक आंबा, दोन उंबर, एक जंगली झाड तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीची 20 नविन झाडे 30 दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.*

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:–</u> विषय क्रमांक. ५ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र ५ :–</u> *सिंध नॅशनल हायस्कूल, गॅ. नं. 1221,1222,1223 व 1224 शेजारी, विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन रोड, उल्हासनगर-3 येथील* ***बदाम, पिंपळ व बोरीचे झाड*** *तोडणेस परवानगी देणे.*

<u>काही सदस्य :–</u>पास पास........

<u>श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती</u> :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.. 

---

☑ <u>विषय क्र ५ :–</u> *सिंध नॅशनल हायस्कूल, गॅ. नं. 1221,1222,1223 व 1224 शेजारी, विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन रोड, उल्हासनगर-3 येथील* ***बदाम, पिंपळ व बोरीचे झाड*** *तोडणेस परवानगी देणे.*

## <u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयाबाबत श्री. मंडरक बी. सिंग यांनी त्यांच्या दिनांक १/६/२०१० च्या पत्रानुसार *सिंध नॅशनल हायस्कूल, गॅ. नं. 1221,1222,1223 व 1224 शेजारी, विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन रोड, उल्हासनगर-3* या ठिकाणी असलेल्या बदाम, पिंपळ व बोराचे झाड तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१. सदर ठिकाणी शाळेचे बांधकाम करणेकरीता नगररचना विभागाकडुन बांधकाम नकाशा मंजुर केलेला असून ०३ छोटी झाडे आहे ते तोडणे आवश्यक असून, परवानगी मागितलेली आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

<u>वृक्षप्राधिकरण ठराव क्र :–</u> १०० <u>दिनांक:– २५/१/२०११</u>

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. अंकुश म्हस्के

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. मंडरक बी. सिंग यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका–याच्या अहवालावरून *सिंध नॅशनल हायस्कूल, ब्‍ॅ. नं. 1221,1222,1223 व 1224 शेजारी, विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन रोड, उल्हासनगर-3* या ठिकाणी असलेले बदाम, पिंपळ व बोरीचे झाड तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीची १५ नविन झाडे ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:–</u> विषय क्रमांक. ६ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र ६ :–</u> *बॅ.नं. 1576, रुम नं. 3, उल्हासनगर-4 या ठिकाणचे* **पिंपळाचे झाड** *तोडणेस देणे.*

<u>काही सदस्य :–</u>पास पास........

<u>श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती</u> :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..



---

☑ <u>विषय क्र ६:–</u> बॅ.नं. 1576, *रुम नं. 3, उल्हासनगर-4 या ठिकाणचे* **पिंपळाचे झाड** *तोडणेस देणे.*

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयाबाबत श्री. प्रदिप साधवानी यांनी त्यांच्या दिनांक ४/१२/२००९ च्या पत्रानुसार **बॅ.नं.** 1576, *रुम नं. 3, उल्हासनगर-4 या ठिकाणचे* **पिंपळाचे झाड** या ठिकाणी असलेल्या पिंपळाचे झाड तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१. उक्त झाड सद्यस्थितीमध्ये धोकादायक वाटत नसले तरी त्यांच्या पायथ्याशी असलेले मुळे आजुबाजुच्या घरांच्या खाली गेल्याने घरांच्या भिंतींना व पायाला धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे सदर झाड तोडणे आवश्यक आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :— १०१ दिनांक :— २५/१/२०११

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. अंकुश म्हस्के

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. प्रदिप साधवानी यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका—याच्या अहवालावरून बॅ.नं. 1576, रुम नं. 3, उल्हासनगर-4 या ठिकाणचे **पिंपळाचे झाड** तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीची ५ नविन झाडे ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:— विषय क्रमांक. ७ वाचुन दाखवितात.

विषय क्र ७ :— ब्लॉक ए 585/1161, शिट नं.38, उल्हासनगर-4, येथील **दोन जंगली व एक कडुलिंबाचे झाड** तोडणेस परवानगी देणे.

काही सदस्य :—पास पास........

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..

---

☑ विषय क्र ७ :— ब्लॉक ए 585/1161, शिट नं.38, उल्हासनगर-4, येथील **दोन जंगली व एक कडुलिंबाचे झाड** तोडणेस परवानगी देणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयाबाबत श्री. कल्याणी जयदेव श्रिचंद यांनी त्यांच्या दिनांक १३/५/२०१० च्या पत्रानुसार *ब्लॉक अे* 585/1161, *शिट नं*.38, *उल्हासनगर*-4,या ठिकाणी असलेल्या दोन जंगली व एक कडुलिंबाचे झाड तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१. सदर जागेवर असलेले दोन जंगली व एक कडुलिंब या जातीचे झाड आहे. सदर ठिकाणी बांधकाम नकाशा मंजुर करण्यात आलेला असून बांधकाम सुरु करण्यात अडथळा करत आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :– १०२ दिनांकः– २५/१/२०११

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. अंकुश म्हस्के

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. कल्याणी जयदेव श्रिचंद यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका–याच्या अहवालावरून *ब्लॉक अे* 585/1161, *शिट नं*.38, *उल्हासनगर*-4 या ठिकाणी असलेली दोन जंगली व एक कडुलिंबाचे झाड तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीची १५ नविन झाडे ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:– विषय क्रमांक. ८ वाचुन दाखवितात.

विषय क्र ८ :– *दसेरा मैदान जवळ, शोभराज गार्डनमधील उल्हसनगर-5 येथील **चार जंगली झाडे** तोडणेस परवानगी देणे.*

काही सदस्य :–पास पास........

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.. 

☑ <u>विषय क्र ८ :—</u> दसेरा मैदान जवळ, शोभराज गार्डनमधील उल्हसनगर-5येथील
**चार जंगली झाडे** तोडणेस परवानगी देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयाबाबत मा. उप विभागीय अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी त्यांच्या दिनांक ३०/९/२०१० च्या पत्रानुसार *दसेरा मैदान जवळ, शोभराज गार्डनमधील उल्हसनगर*-5 या ठिकाणी असलेल्या चार जंगली झाडे तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१. शोभराज गार्डनमधील प्रस्तावित उंच जलकुंभाची टाकी, जेएनएनयुआरएम पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत बांधण्याचे प्रस्तावित असून लवकरच टाकीचे काम सुरु करण्याचे कळविले आहे. सदर जागेवरील (०४) चार मोठी झाडे तोडणे गरजेचे आहे.
२. सदर झाड झुकले आहे. व सदर झाड मुळापासुन पडण्याची शक्यता आहे. पावसामुळे हे झाड केव्हाही तुटुन पडून हानी होण्याची शक्यता आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

<u>वृक्षप्राधिकरण ठराव क्र :—</u> १०३ <u>दिनांक:— २५/१/२०११</u>

सुचकाचे नाव :— श्री. अंकुश म्हस्के

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मा. उप विभागीय अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका—याच्या अहवालावरून *दसेरा मैदान जवळ, शोभराज गार्डनमधील उल्हसनगर*-5 या ठिकाणी असलेले चार जंगली झाडे तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीची २० नविन झाडे ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा:—</u> विषय क्रमांक. ९ वाचुन दाखवितात.

विषय क्र ९ :— जुनी एमआयडीसी साठवण टाकी, पाणी पुरवठा विभाग उत्तर क्षेत्र, उल्हासनगर-1 येथिल सहा झाडे (वड, पिंपळ, गुलमोहर, जंगली 2 झाडें, चाफा) तोडणेस परवानगी देणे

काही सदस्य :—पास पास........

श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे..

---

☑ विषय क्र ९ :— जुनी एमआयडीसी साठवण टाकी, पाणी पुरवठा विभाग उत्तर क्षेत्र, उल्हासनगर-1 येथिल सहा झाडे (वड, पिंपळ, गुलमोहर, जंगली 2 झाडें,

चाफा) तोडणेस परवानगी देणे

## प्रस्तावना

उपरोक्त विषयाबाबत उप विभागीय अभियंता यांनी त्यांच्या दिनांक ७/१/२०११ च्या पत्रानुसार जुनी एमआयडीसी साठवण टाकी, पाणी पुरवठा विभाग उत्तर क्षेत्र, उल्हासनगर-1 या ठिकाणी असलेल्या (वड, पिंपळ, गुलमोहर, जंगली 2 झाडें, चाफा) सहा झाडे तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१. जुनी एमआयडीसी साठवण टाकी येथे नविन पाणी पुरवठयाची नविन साठवण टाकी बांधतांना झाडांचा अडथळा निर्माण होत असल्याबाबत.

२. सदर झाड झुकले आहे. व सदर झाड मुळापासुन पडण्याची शक्यता आहे. पावसामुळे हे झाड केव्हाही तुटुन पडून हानी होण्याची शक्यता आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :— १०४ दिनांक:— २५/१/२०११

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. अंकुश म्हस्के

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उप विभागीय अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका—याच्या अहवालावरून जुनी एमआयडीसी साठवण टाकी, पाणी पुरवठा विभाग उत्तर क्षेत्र, उल्हासनगर-1 या ठिकाणी असलेली वड, पिंपळ, गुलमोहर, जंगली 2 झाडें, चाफा अशी एकुण 6 झाडे तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीची ३० नविन झाडे ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>सदस्य श्री. लाल पंजाबी</u>**:— महापालिका क्षेत्रात यानंतर जन्मास येणा—या मुलांच्या पालकांना त्यांच्या मुलांचे नावे त्यांच्या घरांचे परिसरात किंवा ते सांगतील त्या ठिकाणी महापालिकेतर्फे वृक्ष लावून देण्याची योजना लागु करण्याचा प्रस्ताव पुढील सभेत आला पाहिजे या योजनेनुसार संबधित पालकांनी वृक्ष दत्तक घेवुन त्याचे मुलासारखे फक्त जतन करायचे आहे या योजनेसाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पात योग्य त्या निधीची तरतुद करण्यांत यावी.

**<u>श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त तथा सभापती</u>** :—वृक्ष अधिकारी श्री. मोरे, पुढच्या सभेत हा प्रस्ताव आला पाहिजे आता ही जबाबदारी तुमची राहील.

सायंकाळी ५.१५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे वृक्षप्राधिकरणाचे सभापती मा.आयुक्त श्री. अशोककुमार रणखांब यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका